

देशदूतच्या चाळीसगाव विभागीय कार्यालयाचा नववा वर्धापन दिन शनिवार, २० जुलै रोजी संपन्न झाला. यावेळी विशेषांकाचे प्रकाशन करताना आ.मंगेश चव्हाण, संपादक हेमंत अलोने, वितरण व्यवस्थापक विजय महाजन, उपसंपादक मनोहर कांडेकर, ज्येष्ठ नेते प्रदीप देशमुख, मा.आयकर आयुक्त ॲड.उज्वल कुमार चव्हाण, माजी नगराध्यक्ष भोजराज पुन्शी, चाळीसगाव एज्यु.सो.संचालक डॉ.सुनीलसिंह राजपूत, चाळीसगाव पोलीस निरीक्षक अमितकुमार मनेळ. याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी देशदूतला शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार : वडजी-गुढे गटातील पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

भडगाव । प्रतिनिधी

आ.किशोर पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वडजी-गुढे गट व भडगाव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), माळी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांत शिवसेना शहरासह ग्रामीण भागात बळ मिळवण्यास मदत होणार आहे.

ग्रामीण व शहरातील माळी समाज व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या पदाधिकार्यानी शिवसेनेत प्रवेश केला. त्यात महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस कीसान सेलचे अध्यक्ष दिपक संभाजी महाजन, संचालक रमेश महाजन, महात्मा फुले सेवाभावी मंडळाचे सचिव विनोद महाजन, माळी पंच मंडळाचे अध्यक्ष मुकुंदा महाजन, सावित्रीबाई फुले पतसंस्थेचे अध्यक्ष मनोज महाजन, शिंदिचे माजी सरंपच दिपक महाजन यांच्यासह नावर्याचे प्रकाश महाजन, विजय महाजन, नंदु महाजन, रामचंद्र परदेशी, संदिप परदेशी, राकेश महाजन यांचा समावेश आहे. याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रावसाहेब पाटील,माजी नगराध्यक्ष राजेंद्र पाटील, समन्वय समितीचे अध्यक्ष युवराज पाटील, शिवसेनेचे जिल्हा उपसंघटक संजय पाटील, तालुकाप्रमुख सुधाकर पाटील, जिल्हा समन्वयक डॉ.प्रमोद पाटील शहरप्रमुख आबा चौधरी, विजयकुमार भोसले, रावसाहेब पाटील, माजी नगरसेवक जगन भोई, उप तालुकाप्रमुख संजय वेलजी पाटील, गण प्रमुख सोनू महाजन, कोळगावेचे आबा महाजन, अनिल बिराडी आदि पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थीत होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आजपासून जनविश्वास सप्ताह

जळगाव । प्रतिनिधी

राष्ट्रवादी युवती काँग्रेसचा अभिनव उपक्रम

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजित पवार यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या रावेर लोकसभा जिल्हाध्यक्ष भाग्यश्री विवेक ठाकरे यांच्या संकल्पनेतून अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला असून जनविश्वास सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार व राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा ॲड.संध्याताई सोनवणे यांच्या प्रेरणेने तसेच पक्षाचे उत्तर महाराष्ट्र प्रभारी तथा राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री आमदार अनिल पाटील माजी पालकमंत्री डॉ. सतीश पाटील व गुलाबराव देवकर तसेच रावेर लोकसभा क्षेत्राचे जिल्हाध्यक्ष उमेश नेमाडे यांच्या मार्गदर्शनाने युवती व महिलांचे सक्षमीकरण व्हावे,प्रत्येक क्षेत्रात काम करताना त्यांच्यात आत्मबळ निर्माण व्हावे, व्यक्तिमत्व विकासाचे धडे मिळावेत म्हणून रावेर लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील विविध सहा महाविद्यालयांमध्ये दररोज असे प्रेरणादायी व्याख्याने व मार्गदर्शनाचा मसजग युवती सक्षम युवतीफ हा उपक्रम साजरा होणार आहे.

याच दरम्यान कार्यक्रम असलेल्या प्रत्येक महाविद्यालयात एक वडाचे झाड लावणे व दहा युवतींना त्यांच्या घरी अथवा शेतात लावण्यासाठी 'एक झाड माझ्या दादांचं...!' यानुसार एकूण ६६ वडाची झाडे दत्तक देऊन त्यांच्या संगोपनाचा, दरवर्षी अजितदादांच्या वाढदिवसादिवशी या झाडांचा वाढदिवस साजरा करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

असे आहेत मार्गदर्शक व्याख्यानांचे विषय- प्रत्येक महाविद्यालयांमध्ये स्थानिक पोलीस स्टेशनच्या माध्यमातून सोशल मीडिया हाताळतांना युवती व महिलांनी घ्यावयाची दक्षता,जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने बालविवाह रोखण्यासाठी युवतींच्या पुढाकाराची खरी गरज, अल्पसंख्यांक युवती व महिलांच्या प्रगतीमध्ये समाजाचा वाटा, महिला व युवती सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजना, युवतींना नव्या कृषी क्षेत्राचे आकाश खुणावतेय, युवती अंधश्रद्धा व सजकता या विषयांवर नामांकित व्याख्याते मार्गदर्शन करणार आहेत.जिल्ह्यातील युवतीने उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अभिलाषा रोकडे रावेर लोकसभा जिल्हाध्यक्ष भाग्यश्री ठाकरे व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

धरणगावात माळी समाजातर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा

धरणगाव । प्रतिनिधी

येथील मोठा माळी वाडा समाज सभागृहात इ.दहावी ते उच्च पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेत उत्कृष्ट यशासह विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र देवून गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माळी समाजाचे अध्यक्ष विठोबा महाजन होते.

विचारमंचावर उद्योजक भगवान महाजन, लहान माळी वाडा समाजाचे उपाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, उपाध्यक्ष निंबाजी महाजन, विश्वस्त ज्ञानेश्वर महाजन, गुलाबराव वाघ, मधुकर माळी, दशरथ बापू, विजय महाजन, कैलास माळी, के आर वाघ, माजी मुख्याध्यापक एस डब्ल्यू पाटील, रमेश जगताप, पी डी पाटील, प्रा. कविता महाजन, कु.भावना महाजन, रामचंद्र माळी, योगराज बागुल, राजेंद्र महाजन, वाय पी पाटील, गोपाल महाजन, तुळशीराम भगत, गणेश महाजन, हभप पांडुरंग महाजन, आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थी राज महाजन, कु.भावना महाजन, शिक्षक आर डी महाजन, कैलास माळी, ज्ञानेश्वर महाजन, गुलाबराव वाघ, भगवान महाजन यांनी मनोगत व्यक्त केले.

राज उत्तम माळी ह्या विद्यार्थ्याकडून गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या ग्रंथाचे गुणवंत विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. गुणगौरव सोहळा यशस्वीतेसाठी हेमंत माळी, नितेश माळी, शिपाई कैलास वाघ, श्रीकांत महाजन, जयेश जगताप, अमोल महाजन, शुभम महाजन, अनिल वाडीले, शरद जाधव, राजेंद्र वाघ, आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर. डी. महाजन, सूत्रसंचालन कोषाध्यक्ष विनोद माळी यांनी तर आभार सचिव गोपाल माळी यांनी मानले.

विद्यार्थ्यांनी शिक्षणासह स्वसंरक्षणार्थ गोष्टी आत्मसात कराव्या- श्याम चैतन्य महाराज

रांजणी, ता.जामनेर । वार्ताहर

आपल्या उज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांनी विरंगना अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षण घेताना शैक्षणिक गुणवत्तेसह स्वतःच्या संरक्षणासाठी आवश्यक बाबीही आत्मसात कराव्यात असे श्री गुरुदेव सेवा आश्रम ट्रस्ट चैतन्य धामचे संस्थापक अध्यक्ष श्याम चैतन्य जी महाराज यांनी येथील पंचायत समिती कार्यालयातील सभागृहात वसंतराव नाईक अधिकारी कर्मचारी संघटना यांनी आयोजित केलेल्या स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा साजरा करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी म्हणून जामनेर नगरीच्या प्रथम नागरिक सौ.साधनाताई महाजन, मा.विठ्ठल जाधव बीबी धाडी सर रोहिदास पवार सुरेश जाधव, भारमल नाईक, पितांबर राठोड विस्ताराधिकारी जामनेर पुखराज पवार केंद्रप्रमुख गारखेडा, सिताराम पवार मुख्याध्यापक पाचोरा अनारसिंग राठोड विस्तार अधिकारी पाचोरा, भाजपा जिल्हा युवा अध्यक्ष निलेश चव्हाण, रमेश,नाईक तू कडू नाईक, प्राध्यापक इंदल जाधव रामकिसन नाईक, भाईदास चव्हाण, उदल नाईक, नटवर चव्हाण, लालचंद चव्हाण या प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला व मनोगत व्यक्त करण्यात आले.

महिला सदस्य म्हणून श्रीमती अंजूताईपवार,सविताराठोड,माधुरी नाईक, पितांबर राठोड, पुखराज पवार यांना पदोन्नती मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल जाधव बन्सीलाल चव्हाण खेमराज नाईक रमेश चव्हाण चिंतामण राठोड प्रकाश चव्हाण तुकाराम राठोड अशोक पवार महेंद्र नाईक प्रदीप जाधव उदयसिंग पवार सुनील राठोड अर्जुन चव्हाण जवलसिंग राठोड विनोद राठोड कनक सिंग पवार, कार्यक्रमाचे प्रास्ताविक बन्सीलाल चव्हाण यांनी केले तर सूत्रसंचलन खेमराज नाईक यांनी केले सुमारे ५० विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला गुणगौरवात ट्रॉफी मेडल प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

धरणगाव नूतन सोसायटीच्या चेअरमनपदी विश्वास बयस यांची बिनविरोध निवड

धरणगाव । प्रतिनिधी

येथील नुतन कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी विश्वास देवालालसिंह बयस व व्हाईस चेअरमनपदी, शालीकभाऊ मराठे यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे माजी नगराध्यक्ष तथा उद्योजक सुरेशनाना चौधरी, ज्ञानेश्वर महाजन, जिवनआप्पा बयस, निलेश चौधरी, पप्पुभाऊ भावे विजय महाजन धिरेंद्र पुरभे यांनी स्वागत अभिनंदन केले. संचालक निलेश चौधरी, ज्ञानेश्वर महाजन,सुभाष महाजन,शामसिह चौहान,संगिता महाजन,भरत पाटील, राजेंद्र पवार यांनी या कामी सहकार्य केले. या वेळेस निवडणुक अधिकारी श्री.नंदवळे, सहकारी चंद्रसिंह परिहार, गजानन पाटील, ज्ञानेश्वर पुरभे यांनी काम पाहिले.

शालेय परिसरात उभी राहणार परसबाग

अमळनेर । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळांमध्ये परसबाग उपक्रमास प्रोत्साहन देण्याकरता स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला असून जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. केंद्र शासनाने प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शाळांमध्ये परसबागा निर्माण करुन सदर परसबागांमधून उत्पादित भाजीपाला व इतर पदार्थांचा समावेश शालेय पोषण आहारामध्ये करण्याचे निर्देश १५ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिले आहेत. त्यानुषंगाने विद्यार्थ्यांनी परसबागेत पिकवलेला भाजीपाला, फळे इत्यादींचा समावेश शालेय पोषण आहारात करुन विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येत आहे. परसबाग निर्मितीमुळे विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक निर्माण होवून त्यांना नवनिर्मितीचा आनंद मिळणे, ताज्या भाजीपाल्याचा समावेश पोषण आहारात होवून विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार उपलब्ध होणे असे विविध चांगले हेतू या उपक्रमामुळे साध्य होत आहेत.

चार वर्षांनंतर मिनी मंत्रालयाची निवडणूक गाजणार; आंबेहोळ-रांजणगाव गट सर्वात मोठा

चाळीसगाव । प्रतिनिधी

चाळीसगाव तालुक्यात तब्बल चार वर्षांनंतर होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. आतापासून फोटा-फोटीचे राजकारणास सुरुवात झाली आहे. यात नवीन गट गण रचनेत तालुक्यातील ८ जिल्हा परिषद गट व १६ पंचायत समिती गणांचे चित्र समोर आले आहे. यात सर्वाधिक मोठा गट अबिहोल रांजणगाव गट उरला आहे.

या गटात तब्बल २२ गावाचा समावेश असून या गटात इच्छुकांची चांगली कसोटी लागणार आहे. तर सर्णात लहान गट कळमडू बहाळ ठरला असून या गटात १५ गावे समाविष्ट आहेत. पंचायत समिती गणातही सर्वात मोठा गण हा आंबेहोळ ठरला असून या गणात तब्बल १४ गावे समाविष्ठ आहेत. तर सर्वात कमी ५ गाये पातोडा गणात आहेत. आता पंचायत समितीचे सभापती पदाचे व जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदाचे आरक्षण काय? निघते यावर या गट व गणांमधील लढत रंगण्याची चिन्हे आहेत.

यंदा ग्रामीण भागातील राजकारण मिनी मंत्रालयाच्या निवडनुक चांगलीच गाजणार असल्याचे चिन्ह दिसत आहे. तालुक्यात जिल्हा परिषदेचे ८ गट अस्तित्वात आले असून त्यात आंबेहोळ रांजणगाव गट सर्वात मोठा गट ठरला आहे. या गटात तब्बल २२ गावे समाविष्ट आहेत. तर कळमडू बहाळ गटात १५ गावे, पातोंडा-वाघळी गटात १६ गावे, हिरापूर-टाकळी प्र.चा. गटात १७ गावे, मेणबारे दहिवद नटात १९ गावे, पिलखोड-साथगाव गटात १८ गावे, उंबरखेड हातगाव महाल १८ गावे आणि तळेगाव घोडेगाव गटात २१ गावे समाविष्ट आहेत. तर पंचायत समितीचे १६ गण अस्तित्वात आले असून सर्वांत मोठा गण अबिहोळ ठरला आहे. या गणात तब्बल १४ गावे समाविष्ट आहेत.

तर सर्वात कमी ५ गावे पातोडा गणात आहेत. कळमडू गणात गावे, बहाळ गणात ८ गावे, वाघळी गणात ११ गावे, रांजणगाव गणात ८ गावे, हिरापूर गणात ११ गावे, रावळी प्र.चा. गणात ६ गावे, मेहुणबारे गणात ८ गावे, दहिवद गणात ११ गावे, पिलखोड गणात १० गावे, सायगाव गणात ७ गावे, उंबरखेड गणात गावे, १५ गावे हातगाव गणात ११ गावे, तळेगाव गणात ८ गावे व घोडेगाव गणात १२ गावे समाविष्ट आहेत.

तालुक्यात नगरपालीका क्षेत्र वगळता सध्यस्थितीत मतदार संख्या २ लाख ३२ हजार ८११ इतकी आहे. गेल्या ९ वर्षात ही मतदार संख्या वाढली आहे. आंबेहोळ गणातील गावे आबेहोळ गाणात १४ गावे असून त्यात वाकडी, रोकडे, वाघारी, हातले, जावळे, बाघले, कोमानगर, जामही प्र... चांभार्डी बुक, चांभार्डी खुर्द, खु, सोनगाव, लॉजे, अबिहोळ या गावांचा समावेश आहे. त्यामुळे इच्छुकांची कसोटी लागणार आहे.

एनएसएस स्वयंसेवकांचा 'कुलगुरू युवा प्रेरणा शिबिर'मध्ये सहभाग

पारोळा । प्रतिनिधी

येथील किसान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी कबचौउमवि, जळगाव यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दि.८ जुलै ते १४ जुलै २०२५ दरम्यान विद्यापीठाचे रासयो एकक संचालक डॉ.सचिन नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'कुलगुरू युवा प्रेरणा' या विशेष शिबिरात कृतीशील व उल्लेखनीय सहभाग नोंदविला.

या शिबिरातील त्यांची कामगिरी अत्यंत प्रेरणादायी ठरली असून त्यांच्या यशस्वी सहभागाबद्दल प्राचार्य डॉ. वाय.व्ही. पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाने या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यापीठ क्षेत्रातील महाविद्यालयांतील उत्कृष्ट स्वयंसेवकांना एकत्र आणून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व नेतृत्वगुण वाढविणारे विविध उपक्रम राबवले.

या शिबिरात किसान महाविद्यालयातील दिव्या सुभाष पाटील, पल्लवी संजय पाटील व दिव्या प्रदीप पाटील यांनी सहभाग नोंदवत विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. पर्यावरण संवर्धन, शिस्तबद्धता, गटनायकत्व, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण आणि सामूहिक उपक्रमांत त्यांनी आपल्या कार्यक्षमतेचा ठसा उमटविला. या गौरवप्रसंगी प्राचार्य डॉ. वाय.व्ही.पाटील मनोगत व्यक्त करतांना, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, राष्ट्रभक्ती, कार्यक्षमता व स्वयंशिस्त निर्माण करणारे एक सक्षम व्यासपीठ असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे. अशा शिबिरात सहभाग घेणे म्हणजे केवळ प्रतिनिधित्व नव्हे, तर समाजाप्रत आपली जबाबदारी स्वीकारण्याची सुरुवात असुन आपचे विद्यार्थी विद्यापीठस्तरावर गुणवत्ता सिद्ध करत आहेत, ही महाविद्यालयासाठी आत्यंतिक अभिमानास्पद असल्याची पुष्टी देखिल त्यांनी जोडली. या यशस्वी सहभागासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एस. गायकवाड व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या वेळी उपप्राचार्य डॉ. जी. एस. सोनवणे, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. के.डी. पाटील, डॉ.पी.सी.चौधरी व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल किसान विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष व माजी पालकमंत्री डॉ. सतीश पाटील, जिल्हा परिषद सदस्य रोहन पाटील, महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व पालकांनी अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.